**RNI No. MAHBIL/2009/35529**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

**वर्ष ९, अंक १२]** **गुरुवार ते बुधवार, मार्च २३-२९, २०२३/चैत्र २-८, शके १९४५** **[पृष्ठे १२ किंमत रुपये : १४.००**

### प्राधिकृत प्रकाशन

### शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

**नगरविकास विभाग**

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २०२२.

**अधिसूचना**

क्रमांक टिपीएस-१२२२/२१५२/प्र.क्र.१४८/२२/नवि-१२.— ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस. १८१७/९७३/प्र.क्र.१०३/१७/नवि-१३, दिनांक १३ सप्टेंबर २०१७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७)(यापुढे ज्याचा उल्लेख ' उक्त अधिनियम ' असा करण्यात आला आहे) च्या कलम १५१(१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ६८ उप-कलम (२) अन्वये अधिसूचना क्रमांक सिडको/नैना/न.र.यो.४/ प्रा.यो./२०२२/५६३, दिनांक २१ ऑक्टोबर २०२२ अन्वये मौ.आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिल्लोत्तर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग), ता. पनवेल, प्रारूप नगररचना योजना क्र. ४ मंजूर करण्यात आली असून, सदरची नगररचना योजना ही **शासन राजपत्रा**मध्ये दिनांक ४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. (यापुढे जिचा उल्लेख ' उक्त प्रारूप योजना ' असा केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ७२(१) अन्वये उक्त प्रारुप योजना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लवाद यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारूप योजनेकरिता लवाद म्हणून काम करणेसाठी श्री. श्रीरंग दि. लांडगे, निवृत्त संचालक, नगररचना यांनी संमती दिली आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ उप-कलम (१) अन्वये आणि महाराष्ट्र नगररचना योजना नियम, १९७४ मधील नियम क्र.११ नुसार प्राप्त अधिकारात शासन याद्वारे श्री. श्रीरंग दि. लांडगे, निवृत्त संचालक, नगररचना यांची उक्त प्रारूप योजनेसाठी लवाद म्हणून तात्काळ नियुक्ती करीत आहे. त्यांचे परिश्रमिक व भत्ते शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ नुसार राहतील. तसेच लवाद यांना आवश्यक ते सर्व सहाय्य व त्यांच्यावर देण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्वतंत्र कार्यालय व इतर अत्यावश्यक सोयी सुविधा पुरविण्याबाबत सिडकोस सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. म. शिंदे,**
कार्यासन अधिकारी.

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, 4th Floor, Main Building, Mumbai 400 032, dated 2nd December 2022.

*NOTIFICATION*

No. TPS. 1222/2152/C.R.148/22/UD-12.—Whereas, the Draft Town Planning Scheme No. 4 of villages Aadai (pt), Aakurli (pt), Newali (pt), Shillottor Raychur (pt) and Pali Devad (pt), Taluka Panvel has been sanctioned by the Vice Chairman and Managing Director, CIDCO *vide* Notification No.CIDCO/NAINA/TPS-4/Draft Scheme/2022/563, dated the 21st October, 2022, under sub-section (2) of the section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act ") as per the powers delegated under section 15(1) by the Government in Urban Development Department *vide* Notification No.TPS. 1817/973 /C.R.103/17/UD-13, dated 13th September 2017 of the said Act and has published in *Government Gazette* dated 4th November 2022 (hereinafter referred to as " the said Draft Scheme ") ;

And whereas, as per the provisions of section 72(1) of the said Act, it is necessary to appoint an Arbitrator, within one month from the date on which the said Draft Scheme is published in the *Government Gazette* ;

And whereas, Shri Shrirang D. Landage, Retired Director of Town Planning has given his consent to act as an Arbitrator for the said Draft Scheme.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 72 of the said Act, read with rule No.11 of the Maharashtra Town Planning Scheme Rules, 1974, the Government of Maharashtra hereby, appoints Shri Shrirang D. Landage, Retired Director of Town Planning as an Arbitrator for the said Draft Scheme with immediate effect. Their salary and allowances will be as per the Government Order No. MISC-2715/C.R.100/13, dated 17th December 2016 and further directs the CIDCO to extend all reasonable assistance to the Arbitrator and also provide him with an independent office and other necessary perks to carry out duties cast upon him in the time bound manner and bear the cost on such items.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. M. SHINDE,
Section Officer.